MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

वर्ष : १८ अंक : ४ पाने : ८ जून-जुलै २०२३ PODCAST www.mahatransco.in Follow us on :

**प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,**

आपण आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत प्रवेश करत असून या तिमाहीत माझे कर्मचारी व अधिकारी चांगली कामगिरी करतील, असा मला विश्वास आहे. आपल्या कामाचे `लक्ष्य` (Targets) पूर्ण करणे, ही आपली जबाबदारी आहे, असे प्रत्येकाला वाटणे गरजेचे आहे. आपण अशा क्षेत्रात आहोत, ज्याची गरज सतत वाढतच जाणार आहे. विजेची ही वाढती मागणी म्हणजे आपल्याला दररोज चांगले काम करण्याची संधी आहे. महापारेषण कंपनीची यंत्रणा आपण किती सुसज्ज ठेवतो आणि विजेचा अविरत पुरवठा

- **टीमवर्कने कामात सुधारणा करा**
- **`लक्ष्य` (Targets) पूर्ण करा**
- **पावसाळ्यात दक्षता घ्या**
- **जीवित व वित्तीय हानी नको**

कसा करतो, यावर आपली प्रगती अवलंबून आहे. यासाठी महानिर्मिती व महावितरण कंपन्यांशी सतत समन्वय ठेवण्याची गरज आहे.

सध्या पावसाळा सुरु आहे. पावसाळ्यात संचलन करताना अनेक प्रश्न तयार होतात. त्यासाठी अधिक दक्षतेने यंत्रणा सुसज्ज ठेवली पाहिजे. या काळात काही समस्या उदभवणार नाहीत, याची काळजी प्रत्येक युनिटन् घेतली पाहिजे. पावसाळ्यात प्रकल्पाची कामे मंदावत असली तरी इतर पाठपुराव्याची (Follow-up) कामे मोठ्या जोमाने व गतीने आपण करू शकतो. ती आता केली गेली तर वर्षभर आपण अधिक चांगली सेवा देऊ शकतो. त्यामुळे पाठपुराव्याच्या कामालाही तेवढेच महत्त्व आहे, हे लक्षात ठेवले पाहिजे.

आपण जी सेवा देतो किंवा जी कार्यप्रणाली वापरतो, ती अनेकदा आपल्या वर्षानुवर्षे अंगवळणी पडलेली असते. पण, त्या कार्यप्रणालीत सतत सुधारणा करून ती सक्षम करण्याची जबाबदारी प्रत्येक अभियंता व अधिकाऱ्यांची आहे. त्यादृष्टीने आपण किती विचार करतो, याचा प्रत्येकाने आढावा घ्यावा आणि कार्यप्रणालीत कोणत्या सुधारणा करता येतील, याविषयी पुढाकार घ्यावा. अशा पुढाकाराचे कंपनी नक्कीच स्वागत करेल, ही खात्री आपण सर्वांनी बाळगावी.

देशाच्या आणि राज्याच्या प्रगतीत मोलाचा वाटा उचलणाऱ्या या कंपनीत काम करताना आणखी काही मुलभूत गोष्टी लक्षात घ्यायला हव्यात. त्यातील पहिली म्हणजे आपली दररोजची कामे नियमित आणि वेळेत होतात का? ते करताना कोणतीही जीवित व वित्तीय हानी होता कामा नये. यासाठी आपण विशेष आणि सतत प्रयत्नशील आहोत ना? आपण आपल्या कंपनीच्या एका मोठ्या व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग आहोत. आपण करत असलेल्या कामांमुळेच कामांची एक दीर्घ साखळी पूर्ण होत असते, हे आपण कायम लक्षात ठेवले पाहिजे.

आता तिमाहीत कामाचे नियोजन करणे. त्यात सुधारणा करणे आणि झालेल्या कामाचे मूल्यमापन करणे, अशी सवय आपण आपल्याला लावून घेतली पाहिजे. आधुनिक जगात Quality आणि Quantity अशा दोन्ही गोष्टींचे महत्त्व वाढले आहे. त्यामुळे आपले कार्य गुणात्मक आणि संख्यात्मकदृष्ट्या चांगले असणे गरजेचे आहे. खरं म्हणजे त्याशिवाय आता पर्यायच राहिलेला नाही. आधुनिक जगातील हा सकारात्मक बदल आपण जितका लवकर आणि जितका चांगला समजून घेऊ तितका आपल्या कामातील आपला सहभाग वाढेल. असा उत्स्फूर्त सहभाग या तिमाहीतही आपण द्याल, याची मला खात्री आहे. प्रत्येक कर्मचाऱ्याने योग्य नियोजन, समन्वय व टीमवर्क ठेवून प्रकल्प पूर्ण होण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत. मागील अनुभवातून प्रकल्पाच्या अंमलबजावणीत आलेल्या अडचणी व अडथळे दूर करून नवीन प्रकल्प पूर्ण करण्याचा सचोटीने



**डॉ. संजीव कुमार** (भा.प्र.से.)
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

प्रयत्न केला पाहिजे. प्रत्येक कर्मचाऱ्याने कंपनीच्या `लक्ष्यां`सह (Targets) आवश्यक कार्य केले पाहिजे.

चांगला संघप्रमुख नेहमीच एक ध्येय घेऊन संघाचे नेतृत्व करतो. मी आशा करतो की, कंपनीचा प्रत्येक अधिकारी त्यांच्या टीमचे नेतृत्व करताना निश्चितपणे गुणवत्ता वाढविण्याचा प्रयत्न करेल. अशक्य वाटणारं काम करण्याचं सामर्थ्य टीमवर्कमध्ये असते. मला खात्री आहे की, प्रत्येक कर्मचारी भविष्यात यशाच्या मार्गाकडे जाण्यासाठी चांगले गुण आत्मसात करण्याचा नक्कीच प्रयत्न करेल.

**शुभेच्छांसह..!**

**– डॉ. संजीव कुमार**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

**सविस्तर व्हिडिओ पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा**

निवड

उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी दिली शपथ

# एमईआरसीच्या सदस्यपदाची श्री. आनंद लिमये, श्री. सुरेंद्र बियाणींनी घेतली शपथ



Follow us on :

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगावर सदस्यपदी नियुक्त श्री. आनंद मधुकर लिमये व श्री. सुरेंद्र जगन्नाथ बियाणी या सदस्यांचा शपथविधी झाला. सह्याद्री राज्य अतिथीगृह, मुंबई येथे झालेल्या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी नियुक्त सदस्यांना शपथ दिली.

यावेळी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचे अध्यक्ष श्री. संजय कुमार, ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती आभा शुक्ला, महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ संजीव कुमार, महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. पी.अनबलगन हे उपस्थित होते.

# महापारेषणच्या सहाय्यक अभियंत्यांसाठी (स्थापत्य) प्रशिक्षण शिबिर

Follow us on :

महापारेषण कंपनीच्या २५ नवनियुक्त सहाय्यक अभियंता (स्थापत्य) यांच्यासाठी अंधेरी, मुंबई येथे व विभागीय प्रशिक्षण केंद्र तळंदगे, कोल्हापूर येथे प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले.

या अभियंत्यांना महापारेषण कंपनीची माहिती व कामकाजाबद्दल तसेच महापारेषण कंपनीत लागणाऱ्या स्थापत्य अभियांत्रिकी विषयाची उजळणी करण्यासाठी ४५ दिवसांचे प्रशिक्षण अंधेरी, मुंबई येथे व विभागीय प्रशिक्षण केंद्र, तळंदगे, कोल्हापूर येथे १५ दिवसीय शिबिर घेण्यात आले. अंधेरी, मुंबई येथील ३० दिवसांच्या प्रशिक्षणामध्ये अनुभवी तज्ज्ञ स्थापत्य अभियंत्यांकडून विविध स्थापत्य विषयांबाबत माहिती देण्यात आली. त्यांनी त्यांचे प्रत्यक्ष अनुभव सांगितले. तसेच या संस्थेने जलशुद्धीकरण केंद्र, भांडूप, भुयारी मेट्रो स्टेशन, अंधेरी व ग्रीन बिल्डींग येथे भेट दिली. तेथील स्थापत्य विभागाशी संबंधित माहिती देण्यात आली. उर्वरित १५ दिवसांचे प्रशिक्षण महापारेषण कंपनीच्या विभागीय प्रशिक्षण केंद्र, तळंदगे, कोल्हापूर येथे घेण्यात आले. यामध्ये विविध स्थापत्य कामाची माहिती महापारेषण कंपनीतील वरिष्ठ स्थापत्य अभियंत्यांमार्फत देण्यात आली. तसेच मानव संसाधन, वित्त व विद्युत विभागांसंबंधी माहिती वरिष्ठ अभियंते व अधिकाऱ्यांमार्फत देण्यात आली.

स्थापत्य कट्टा म्हणून नावीन्यपूर्ण उपक्रमांतर्गत मुख्य अभियंता (स्थापत्य) श्री. भूषण बल्लाळ, मुख्य अभियंता (स्थापत्य) (निवृत्त) श्री. उ. म. कावळे, अधीक्षक अभियंता (स्थापत्य) (निवृत्त) श्री. मनुरकर, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) (निवृत्त) श्री. भिसे यांनी त्यांचे अनुभव प्रश्न उत्तरांच्या शृंखलेव्दारे सांगितले.

शिक्षण-प्रशिक्षण



याप्रसंगी प्रशिक्षणार्थी अभियंत्यांनी विविध गटांमध्ये त्यांना ४५ दिवसांत मिळालेले मार्गदर्शन व माहिती नाट्य स्वरूपात सादर केली. यावेळी कराड परिमंडळाचे मुख्य अभियंता (प्रभारी) श्री. सी. कोळी, मुख्य अभियंता (स्थापत्य) श्री. भूषण बल्लाळ, अधीक्षक अभियंता (स्थापत्य) (प्रभारी) श्री. संजय किनकर, अधीक्षक अभियंता (संवसु) श्री. प्रांजल कांबळे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. राजू कोळी यांच्या हस्ते प्रशिक्षण प्रशस्तीपत्र प्रशिक्षणार्थी अभियंत्यांना देण्यात आले.

## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती-निवृत्ती माहे जून-जुलै २०२३

### नियुक्ती

| अ.क्र. | नाव (सर्वश्री) | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | मोहन ननावरे | अधीक्षक अभियंता (स्थापत्य ) | अति उच्च दाब स्थापत्य मंडळ, ऐरोली | २१.०६.२०२३ |
| २. | प्रकाश लिमकर | अधीक्षक अभियंता (स्थापत्य ) | अति उच्च दाब स्थापत्य मंडळ, अमरावती | १३.०७.२०२३ |

### निवृत्ती

| अ.क्र. | नाव (सर्वश्री) | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | विलास खाचणे | अधीक्षक अभियंता (पारेषण) | अति उच्च दाब संवसु मंडळ, खडका भुसावळ | ३०.०६.२०२३ |
| २ | रंगनाथ शेळके | अधीक्षक अभियंता (पारेषण) | संरक्षण, स्वयंचलन, दूरसंचारण मंडळ, औरंगाबाद | ३०.०६.२०२३ |
| ३ | राजेंद्र गायकवाड | मुख्य अभियंता (पारेषण) | अति उच्च दाब प्रकल्प नि संवसु परिमंडळ, पुणे | ३१.०७.२०२३ |
| ४ | संजय परदेशी | अधीक्षक अभियंता (पारेषण) | अति उच्च दाब प्रकल्प मंडळ, औरंगाबाद | ३१.०७.२०२३ |

# महापारेषण समाचार आता पॉडकास्ट स्वरूपात...



विजेच्या माध्यमातून सर्वांच्या घरी आनंदाचा, विकासाचा प्रकाश पडावा, अशा शुभेच्छा मा. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री **श्री. देवेंद्र फडणवीस** यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी अर्थात महापारेषणच्या १८ व्या वर्धापनदिनानिमित्त दिल्या.






महापारेषणच्या १८ व्या वर्धापनदिनानिमित्त महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक **डॉ. संजीव कुमार** यांचा शुभ संदेश.

६ जून २०२३ रोजी महापारेषणचा १८ वा वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित्त जनसंपर्क विभागाने (सांघिक सुसंवाद विभाग) तयार केलेला हा व्हिडिओ. सोबतचा क्यूआर कोड स्कॅन करून संपूर्ण व्हिडिओ पहा.



महापारेषणच्या १८ व्या वर्धापनदिनानिमित्त महापारेषणचे संचालक (प्रकल्प) **श्री. नसीर कादरी** यांचा शुभ संदेश.



महापारेषणच्या १८ व्या वर्धापनदिनानिमित्त महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) **श्री. सुगत गमरे** यांचा शुभ संदेश.

## 'महापारेषण समाचार' आता डिजिटल स्वरूपात...

सोबतचा QR कोड स्कॅन करा आणि वाचा अंक








**आनंदसोहळा**

**मुंबई :** महापारेषणच्या १८ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजिलेल्या राज्यस्तरीय पारितोषिक वितरण समारंभाचे उद्घाटन करताना महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार. याप्रसंगी संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर, संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे.

**कार्यक्रमाचा व्हिडिओ पाहण्यासाठी सोबतचा क्यूआर कोड स्कॅन करा.**

## ▶ महापारेषणचा १८ वा वर्धापनदिन उत्साहात साजरा

# महापारेषणच्या माध्यमातून विविध प्रकल्पांची कामे प्रगतिपथावर : डॉ. संजीव कुमार

Follow us on :

''महापारेषणच्या माध्यमातून विविध प्रकल्पांची कामे अतिशय वेगाने सुरू असून ती प्रगतिपथावर आहेत. सुधारित RoW धोरणामुळे शेतकऱ्यांना त्यांचा मोबदला मिळणार आहे. महापारेषणकडून वाहिनी उभारताना संबंधित जमीन मालकास जमिनीची नुकसान भरपाई (RoW), पिकांची व झाडांची नुकसान भरपाईचा मोबदला देण्यास होणारा विलंब टाळण्यासाठी महापारेषणच्या खात्यातून रक्कम थेट जमीन मालकाच्या खात्यात जमा होणार आहे.'', असे प्रतिपादन महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी केले.

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या १८ व्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने आयोजिलेल्या राज्यस्तरीय पारितोषिक वितरण समारंभात डॉ. संजीव कुमार बोलत होते. यावेळी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनीचे संचालक (स्वतंत्र) श्री. विश्वास पाठक, महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री, संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे उपस्थित होते. सुरुवातीला उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी महापारेषणला दूरदृश्य प्रणालीव्दारे सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना शुभेच्छा संदेश दिला. प्रास्ताविकात महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे म्हणाले, ''कंपनीची संस्कृती व कर्मचाऱ्यांमध्ये एकसंघ वातावरण निर्माण करण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांनी एकत्र येणे, सकारात्मक विचारांची देवाणघेवाण करणे, मैत्रीपूर्ण वातावरण निर्माण करून कंपनीचा विकास साधावा, या हेतूने महापारेषणतर्फे कंपनीचा १८ वा वर्धापनदिन व पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, हा त्यामागचा हेतू आहे.

श्री. नसीर कादरी म्हणाले, ''महाराष्ट्रातील विविध उपकेंद्रात इतर अधिकारी व कर्मचारी काम करत असल्यामुळे आपण हा पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम करीत आहोत. नाशिक परिमंडळात चक्रीवादळामुळे बंद पडलेले रोहित्र तत्काळ सुरु केले.''

श्री. विश्वास पाठक म्हणाले, ''तिन्ही कंपन्यांकडे विविध संधी व आव्हाने आहेत. सध्या २८ हजार मेगावॉट एवढी वीजमागणी आहे. भविष्यात ती ४० हजार मेगावॉट एवढी होईल. त्यासाठी महापारेषणचे जाळे मजबूत करावे लागेल.''

डॉ. संजीव कुमार म्हणाले, ''देशात अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रात मोठी संधी आहे व आव्हाने आहेत. पाच हजार मेगावॉटपेक्षा जास्त ऊर्जा तयार करण्यासाठी एक हजार सर्किट किलोमीटर अति उच्च दाब पारेषण वाहिनी सुरू करण्याचे धोरण आहे. महापारेषण ही देशात सर्वोत्तम पारेषण कंपनी आहे. महापारेषणने ड्रोनचा वापर सुरु केला आहे. हा ड्रोनचा वापर हा विशेषतः दुर्गम भागातील अति उच्च दाब वाहिन्यांचे वेळेवर सर्व्हेक्षण व देखरेख करण्यासाठी चांगला निर्णय ठरला आहे. महापारेषणच्या अधिकाऱ्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने उपविभाग स्तरापासून सांघिक कार्यालय स्तरापर्यंत पुरस्कार योजना सुरु केली आहे. भविष्यातही अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ही पुरस्कार योजना चालू राहील.''

ऊन-पावसाची तमा न बाळगता विशेष कामगिरी केलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही विविध मनोरंजनात्मक कार्यक्रम यावेळी सादर केले. जनसंपर्क विभागाच्या समन्वयातून महापारेषणच्या सर्वंकष कार्यावर प्रकाश टाकणाऱ्या चित्रफितीने वातावरण ऊर्जामय झाले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महापारेषणचे मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. सुधीर वानखेडे, महाव्यवस्थापक (मानव संसाधन, मनुष्यबळ नियोजन) श्री. राजू गायकवाड, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, अधीक्षक अभियंता (प्र.) श्री. योगेश पाचपांडे, शिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव, जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे, संचालक (मानव संसाधन) यांचे विशेष कार्य अधिकारी तथा व्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. महेश आंबेकर यांच्यासह विविध अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या सोहळ्याला राज्यातील विविध परिमंडळातील अधिकारी, कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. विनायक शिंदे यांनी केले तर आभार कार्यकारी संचालक (राज्य भार प्रेषण केंद्र) श्री. शशांक जेवळीकर यांनी मानले.

## क्षणचित्रे...





















Happy Anniversary

## महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री यांची उपस्थिती

# औरंगाबाद परिमंडळात महापारेषणचा १८ वा वर्धापनदिन सोहळा जल्लोषात साजरा

Follow us on :

महापारेषण कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली औरंगाबाद परिमंडळात महापारेषण कंपनीचा १८ वा वर्धापनदिन व पारितोषिक वितरण सोहळा रुक्मिणी सभागृह, महात्मा गांधी मिशन, औरंगाबाद येथे मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला.

पारितोषिक वितरण करण्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी औरंगाबाद परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. अविनाश निंबाळकर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अधीक्षक अभियंता (स्थापत्य) श्री. संजीव कांबळे यांनी केले. याप्रसंगी महापारेषण कंपनीमध्ये उपकेंद्र व वाहिनीत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी पारितोषिक योजना सुरू करण्यामागचा हेतू व महापारेषण कंपनीतील



**औरंगाबाद :** येथील परिमंडळाच्या वतीने महापारेषण कंपनीचा १८ वा वर्धापनदिन व पारितोषिक वितरण सोहळा महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री यांच्या हस्ते झाला. याप्रसंगी मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, औरंगाबाद परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. अविनाश निंबाळकर, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. बलराज पारिपेल्ली व अन्य अधिकारी वर्ग.

कर्मचाऱ्यांनी सन २०२२-२०२३ या वर्षात केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल माहिती दिली.

महाराष्ट्रातून राज्यस्तरावर विद्युत प्रणाली व प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, वाळूज, औरंगाबाद या प्रशिक्षण केंद्राने प्रथम क्रमांक पटाकाविला. औरंगाबाद परिमंडळातील परिमंडळातील २२० के. व्ही. चितेगाव व १३२ के. व्ही. गंगापूर या उपकेंद्राला प्रथम, २२० के. व्ही. हिंगोली व १३२ के. व्ही. किल्लारी या उपकेंद्राला व्दितीय पारितोषिक देण्यात आले. अति उच्च दाब वाहिनी उपविभागामध्ये उस्मानाबाद उपविभाग व पडेगाव उपविभाग यांना अनुक्रमे प्रथम व व्दितीय क्रमांक मिळाला. तसेच उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अशा एकूण ११ समूहांना प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

यावेळी सांस्कृतिक कार्यक्रमही घेण्यात आला. यामध्ये औरंगाबाद परिमंडळातील अधिकारी, कर्मचारी व त्यांचे पाल्य यांनी आपल्यातील सुप्त कलागुण, शास्त्रीय संगीत, कथ्थक नृत्य सादर केले.

यावेळी महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री म्हणाले, ``मराठवाड्यातील लोकांमध्ये विविध कलागुण आणि बौध्दिक क्षमता आहे. या बौध्दिक क्षमतेचा उपयोग करून परिमंडळातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपला वेगळा ठसा महाराष्ट्रात उमटवावा. प्रत्येकाने कार्यालयीन कामकाज पार पाडताना नियमांचे पालन करून दिलेल्या वेळेमध्ये आणि गुणवत्ता राखून काम करण्यास आग्रही असावे.''

महापारेषणचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील यांनीही उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल सर्व चमूचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय समारोप मुख्य अभियंता श्री. अविनाश निंबाळकर यांनी केला. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. बलराज पारिपेल्ली, सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) श्री. प्रवीण यशवंते यांचेसह आयोजन समितीच्या सदस्यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती मंजूषा दुसाने, श्रीमती मेधा देशमुख व श्रीमती रोहिणी धनबहादूर यांनी केले. आभार श्रीमती सीमा गाडेकर यांनी मानले.





**नाशिक :** महापारेषणच्या १८ व्या वर्धापनदिनानिमित्त नाशिक परिमंडळात विविध पारितोषिक वितरण सोहळा जल्लोषात झाला. याप्रसंगी नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता सर्वश्री संजीव भोळे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भरत पाटील, माणिक गुट्टे, प्रवीण भालेराव, विलास खाचणे, अनिल भारसाकळे व अन्य अधिकारी वर्ग.

## मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील यांची उपस्थिती

# नाशिक परिमंडळात महापारेषणचा १८ वा वर्धापनदिन उत्साहात

Follow us on :

महापारेषणच्या १८ व्या वर्धापनदिनानिमित्त नाशिक परिमंडळात विविध पारितोषिक वितरण सोहळा जल्लोषात झाला.

सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. संजीव भोळे होते. तर सोहळ्याचे प्रमुख अतिथी म्हणून मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील उपस्थित होते. याप्रसंगी अधीक्षक अभियंता श्री. माणिक गुट्टे, श्री. प्रवीण भालेराव, श्री. विलास खाचणे, श्री. अनिल भारसाकळे, सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) श्री. विजय नलावडे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. प्रमोद गोडसे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरूवातीला अधीक्षक अभियंता श्री. प्रवीण भालेराव यांनी प्रस्तावना मांडली. यानंतर मुख्य बक्षीस वितरण सोहळा झाला. १३२ के. व्ही. उपकेंद्र व प्रोजेक्ट लाईन संवर्गातील उपकेंद्र व उपविभाग यांनी परिमंडळांतर्गत प्रथम, व्दितीय अशा स्वरूपात बक्षीसे मान्यवरांच्या हस्ते दिली. सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र असे या बक्षीसाचे स्वरूप होते.

यावेळी उपकार्यकारी अभियंता श्री. बिपीन चव्हाण, श्री. आदर्श चौधरी यांचाही मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.


@maha_transco MahaTransco @Mahatranscoltd www.mahatransco.in



▶ संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री यांची उपस्थिती

# महापारेषणच्या वर्धापनदिनी गाणी, संगीत आणि नृत्य

Follow us on :

गाणी, संगीत, नृत्य आदी सांस्कृतिक कार्यक्रमांबरोबरच रिदमिक योगा, एकपात्री प्रयोग आदींच्या माध्यमातून महापारेषण कंपनीचा १८ वा वर्धापनदिन पुणे परिमंडळात जल्लोषात साजरा झाला. याप्रसंगी क्षेत्रीय पुरस्कार वितरण सोहळाही झाला.

महापारेषण कंपनीचे संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री प्रमुख पाहुणे होते. यावेळी मुख्य व्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील तर पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. राजेंद्र गायकवाड उपस्थित होते. तसेच पुणे परिमंडळातील अधीक्षक अभियंता श्री. जयंत कुलकर्णी, श्री. प्रकाश कुरसंगे, श्री. सतीश गायकवाड, श्री. प्रमोद भोसले, श्री. राम शेळके तसेच सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. प्रशांत चौधरी, सहाय्यक मुख्य दक्षता अधिकारी श्री. मिलिंद घोलप, श्री. सुभाष भिलारे आदी अधिकारी व कर्मचारी सहकुटुंब उपस्थित होते.

कार्यक्रमात २२० के. व्ही. मगरपट्टा उपकेंद्र, २२० के. व्ही. थेऊर उपकेंद्र, १३२ के. व्ही. सांगोला उपकेंद्र, १३२ के. व्ही. सणसवाडी उपकेंद्र, तसेच लाईन्स मेंटेनन्स उपविभाग पुणे, बारामती तसेच ईएचव्ही लाईन प्रोजेक्ट सब डिव्हीजन हिंजवडी, ईएचव्ही लाईन प्रोजेक्ट सब डिव्हीजन बारामती या केंद्रांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यासोबतच टेस्टिंग टीम, सिव्हील टीम, हॉटलाईन टीम, पीआयडी टीम व एसआय युनिट यांचाही गौरव झाला. अधीक्षक अभियंता श्री. जयंत कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन श्रीमती मेघा पांडे व कीर्ती सानप यांनी केले. श्री. वर्षा बोरकर यांनी आभार मानले.

याप्रसंगी सहाय्यक अभियंता श्रीमती प्रज्ञा जोशी, सहाय्यक अभियंता श्री. मंदार डांगे, श्री. दत्ता मालखरे, कार्यकारी अभियंता श्री. महेंद्र काटेंगे, श्रीमती निवेदिता कुलकर्णी, मुख्य अभियंता श्री. राजेंद्र गायकवाड आदींनी सांस्कृतिक कार्यक्रमांत भाग घेतला. यावेळी हास्यकलाकार श्री. दीपक देशपांडे यांचा `हास्यकल्लोळ` हा एकपात्री प्रयोग झाला.



**पिंपरी चिंचवड :** महापारेषणच्या १८ व्या वर्धापनदिनानिमित्त पुणे परिमंडळाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात क्षेत्रीय पुरस्काराचे वितरण महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील व अन्य अधिकारी.

आमच्याशी कनेक्टेड रहा
@maha_transco @maha_transco MahaTransco
MahaTransco Mahatranscoltd MahaTransco

Happy foundation Day



**पनवेल :** वाशी परिमंडळाच्या वतीने महापारेषण कंपनीच्या १८ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजिलेल्या क्षेत्रीय पातळीवरील पारितोषिक वितरण सोहळ्याचे दीपप्रज्वलन करून उद्घाटन करताना महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके, मुख्य अभियंता (स्थापत्य) श्री. भूषण बल्लाळ, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील.

## ▶ महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे यांची उपस्थिती

# महापारेषणच्या १८ व्या वर्धापनदिनानिमित्त वाशी परिमंडळात विविध कार्यक्रम उत्साहात

Follow us on :

वाशी परिमंडळाच्या वतीने महापारेषण कंपनीचा १८ वा वर्धापनदिन आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके सभागृह, पनवेल येथे उत्साहात झाला.

वाशी परिमंडळांतर्गत क्षेत्रीय पातळीवरील पारितोषिक वितरण सोहळ्यानिमित्त मनोरंजनात्मक कार्यक्रम घेण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, कार्यकारी संचालक (संचलन) श्री. रोहिदास मस्के, मुख्य अभियंता (स्थापत्य) श्री. भूषण बल्लाळ, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील उपस्थित होते. क्षेत्रीय स्तरावरील पारितोषिक विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.

यामध्ये २२० के. व्ही. कांबा उपकेंद्र यांना प्रथम तर २२० के. व्ही. नेरूळ उपकेंद्राला व्दितीय क्रमांक देण्यात आला. १३२/११०/१०० के.व्ही. उपकेंद्र गटात १०० के. व्ही. पाताळगंगा उपकेंद्राला प्रथम तर १०० के. व्ही. रोहा उपकेंद्राला व्दितीय क्रमांक देण्यात आला. वाहिनी देखभाल उपविभाग गटात अउदा वाहिनी देखभाल उपविभाग, कळव्याला प्रथम तर अउदा वाहिनी देखभाल उपविभाग, महाडला व्दितीय क्रमांक देण्यात आला. प्रकल्प/ वाहिनी/उपकेंद्र उपविभाग गटात अउदा उपकेंद्र प्रकल्प उपविभाग, खारघरला प्रथम, अउदा वाहिनी प्रकल्प उपविभाग, पनवेलला व्दितीय, अउदा उपकेंद्र प्रकल्प उपविभाग, कल्याणला तृतीय व अउदा वाहिनी प्रकल्प उपविभाग, कल्याणला चतुर्थ क्रमांक देण्यात आला.



**पनवेल :** वर्धापनदिन सोहळ्यात नृत्य सादर करताना महिला अधिकारी.

तसेच परिमंडळांतर्गत उत्कृष्ट कामगिरीसाठी उदादिधा टर्मिनल, स्टेशन, पडघे, उदादिधा तारमार्ग संवसु विभाग, राजगुरूनगर, उदादिधा तारमार्ग संवसु विभाग, जालना, पीआयडी युनिट, कळवा, पीआयडी युनिट, पनवेल, प्रमुख भांडार, पनवेल, हॉटलाईन युनिट, कळवा, हॉटलाईन युनिट, खारघर, सर्व वित्त व लेखा विभाग, वाशी परिमंडळ, सर्व मानव संसाधन विभाग, वाशी परिमंडळ यांना विशेष पुरस्काराने गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाचे यजमानपद अउदा संवसु मंडळ, पनवेल यांच्याकडे सोपविण्यात आले होते. यामध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांनी गीतगायन, नृत्य, समूहनृत्य, पर्यावरण गीत, प्रबोधनपर कार्यक्रम सादर केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) डॉ. शितल गेडाम, व्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुहास रोकडे, व्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुभाष सोनवणे, श्री. राकेश माने यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके यांनी केले. सूत्रसंचालन श्रीमती विभावरी बाविस्कर, श्री. रितेश चौधरी, श्री. उमर तांबोळी यांनी केले. आभार श्री. मोहन ननवरे यांनी मानले.

संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by **Dr.Milind Awatade** PRO for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,** Printed at **Jyotirling Enterprises :** 315-B. Deen Bldg. Compound, Shop No. 32, N.M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011. Tel. No.: 23002574 & Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai - 400 051. The Company accepts no responsibility for the matter published in the journal.